# मुकुल माधव, फिनोलेक्स इंडस्ट्रीजतर्फे पीडितांना मदत

पुणे : पीव्हीसी-यू पाइप्स आणि फिटिंग्जची भारतातील सर्वांत मोठी उत्पादक कंपनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि तिची सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशन (एमएमएफ) यांनी ओडिशामधील बालासोर येथे नुकत्याच झालेल्या रेल्वे अपघातातील पीडितांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

अपघात झालेल्या भागात रुग्णांची वर्दळ जास्त असल्याने अपघातग्रस्त, त्यांचे नातेवाईक, डॉक्टर्स, परिचारिका, वैद्यकीय सहाय्यक आणि सफाई कर्मचारी यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. अन्न आणि पिण्याचे शुद्ध पाणी या त्यांच्या प्रमुख गरजा असल्याचे लक्षात घेऊन कंपनीने साहाय्य करण्यासाठी पुढे पाऊल टाकले. कटक रुग्णालय आणि प्रदेशाबाहेरील ट्रामा सेंटरमधील गरजू लोकांपर्यंत फाउंडेशन पोहोचले. स्थानिक स्रोतांमार्फत अन्नाची सोय करणे या स्वरूपात अजूनही मदतकार्य चालू आहे.

या अपघातावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाबरिया म्हणाल्या, 'या संकटाला तोंड देण्यासाठी अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्यांसाठी आलेली पथके, त्यांचे अथक परिश्रम व त्यांच्यातील माणुसकी पाहणे हे भारावून टाकणारे आहे. संकटाच्या वेळी नेहमी पुढे येऊन मदत करणारी एक परिसंस्था असणे हा एक सन्मान आहे.'

एमएमएफने आतापर्यंत चक्रीवादळ, पूर आदी नैसर्गिक आपत्तींच्या वेळी पीडितांना मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. कोविड बाधितांनादेखील त्यांनी साहाय्य केले